राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणीसाठी मानकांबाबत विधेयकाच्या अनुषंगाने सूचना पाठविण्याचे आवाहन >> पान 2

अमळनेरः पुरात अडकलेल्या एक महिन्याच्या बाळासह कुटुंबाची थरारक सुटका >> पान 3

बुलढाण्यात पावसाचा धुवाधार कहर >> पान 4


सुविचार
वादळं येतात ते तुम्हाला मजबूत बनवायला.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 17 ■ शनिवार, दि. 01 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




## राज्यभरात पावसाचं थैमान ! नाशिकला रेड अलर्ट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार राज्यभरात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक जिल्ह्यांना पावसाने अक्षरश: झोडपून काढलं आहे. तर येणारे २४ तास महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांसाठी अत्यंत आव्हानात्मक असल्याचे सांगितले जात आहे.

नाशिकला रेड अलर्ट

हवामान विभागाकडून नाशिक जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यानुसार जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पावसाने बॅटिंग केली आहे. जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे नदी-नाल्यांच्या पाणीपातळीत वाढ होत असून परिस्थितीवर प्रशासनाकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. दरम्यान, नाशिक शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणातून २,४९८ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. धरणातून पाणी सोडण्यात येत असल्याने नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. जळगाव जिल्ह्यासाठीही आज रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यानुसार जळगावमध्ये गुरुवारपासून सुरू असलेल्या संततधार आणि जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे जिल्ह्यातील बहुतांश सर्व लहान-मोठ्या नद्या दुथडी भरून वाहत आहेत. अनेक ठिकाणी पुलांवरून पाणी वाहू लागल्याने प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. बोरी, अंजनीसह अनेक नद्यांना यंदाच्या पावसाळ्यात प्रथमच मोठा पूर आल्याने नदीकाठच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



## गजबजलेल्या मार्केट यार्डमध्येच तरुणावर शस्त्रानं सपासप वार

**पुणे । प्रतिनिधी :** पुण्यातील अत्यंत गजबजलेल्या मार्केट यार्ड परिसरात एक धक्कादायक घटना घडली. यात जुन्या भांडणाच्या रागातून एका २७ वर्षीय तरुणावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला करण्यात आला. भररस्त्यात झालेल्या या रक्तरंजित थरारामुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून काही काळ घबराटीचे आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याला वाचवण्यासाठी गेलेल्या त्याच्या भावालाही आरोपींनी सोडलं नाही.

ही धक्कादायक घटना २६ जुलै रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली. मार्केट यार्डमधील आंबेडकरनगर येथील साईबाबा मंदिरासमोरील सार्वजनिक रस्त्यावर हा थरार पाहायला मिळाला. आशुतोष नाना क्षीरसागर (वय २७, रा. सुखसागरनगर, बिबवेवाडी, पुणे) असे गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून त्यांनी स्वत: याप्रकरणी पोलिसांत फिर्याद दिली आहे.

## मी पीएम मोदींचा लाइफटाईम समर्थक पण... भाजपच्या बड्या नेत्याने अचानक सोडला पक्ष

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** सत्ताधारी भारतीय जनता पक्षाची बाजू माध्यमांमध्ये आक्रमकपणे मांडणारे, काँग्रेसला जोरकसपणे विरोध करणारे प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी भाजपला राम राम केला आहे. त्यांच्या या निर्णयाने राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे. पूनावाला यांनी आपल्या राजीनामा पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडे सोपवला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. नेहमी अत्यंत आक्रमकपणे पक्षाची बाजू मांडणाऱ्या पूनावाला यांच्या या अचानक घेतलेल्या निर्णयामुळे राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे.

## भिवंडीत चार मजली इमारत कोसळली, नऊ जणांचा मृत्यू; मुख्यमंत्र्यांनी दिले कारवाईचे आदेश

**ठाणे । प्रतिनिधी :** भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील नारपोली गंगाराम वाडी येथील कोहिनूर अपार्टमेंट ही तळ अधिक चार मजली अतिधोकादायक ठरवलेली इमारत गुरुवारी रात्री साडे अकरा वाजताच्या सुमारास पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अडकून सात जणांचा मृत्यू झाला असून, तीन ते चार जण आणखी ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.कोहिनूर अपार्टमेंट ही २००७ मध्ये बनवण्यात आली असून, या इमारतीमध्ये दोन अपार्टमेंट आहेत. एका अपार्टमेंटमध्ये १५ असे एकूण ३० रूम या इमारतीमध्ये आहेत. परंतु, कमकुवत काम असल्याने सुरुवातीपासूनच इमारत धोकादायक झाल्याने पालिकेने ही इमारत धोकादायक घोषित केली होती.

या इमारतीच्या एका विंगच्या तळमजल्यावर काही पिलर नादुरुस्त झाल्याने त्याची दुरुस्ती केली जात असल्याने सायंकाळी सहा वाजतापासूनच इमारतीला तडे जाण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे रात्री आठ वाजता इमारत एका बाजूने झुकत असल्याने पालिका प्रभाग समिती क्रमांक चारचे सहाय्यक आयुक्त अरविंद घोगरे यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल होत इमारत निर्मनुष्य केली. परंतु, त्यानंतरही तळमजल्यावरील दुरुस्ती काम सुरू राहिल्याने व काही कुटुंबातील व्यक्ती साहित्य घेण्यासाठी इमारतीमध्ये आल्याने दुर्घटना घडल्यानंतर या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली आणखी तीन ते चार जण अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## मुंबईतील रुग्णालयात धक्कादायक प्रकार; नवजात बाळ कचरापेटीत सापडल्याने खळबळ

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबईतील जोगेश्वरी येथील ट्रॉमा केअर रुग्णालयात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. १९ वर्षीय अविवाहित तरुणीने रुग्णालयातील स्वच्छतागृहात अकाली बाळाला जन्म दिल्यानंतर नवजात बाळाला कचरापेटीत टाकल्याची घटना सोमवारी (२७ जुलै) घडली. सुदैवाने बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकून रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी वेळीच धाव घेत त्याचा जीव वाचवला.

रुग्णालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणी पोटदुखीच्या तक्रारीनंतर अपघात व आपत्कालीन विभागात उपचारासाठी दाखल झाली होती. नोंदणी झाल्यानंतर ती स्वच्छतागृहात गेली. तिथेच तिने अकाली बाळाला जन्म दिला. त्यानंतर तिने नवजात बाळाला कचरापेटीत टाकल्याचा आरोप आहे.

काही वेळाने स्वच्छतागृहातून बाळाच्या रडण्याचा आवाज येऊ लागल्याने रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना संशय आला. संबंधित तरुणीने स्वच्छतागृहाचा दरवाजा आतून बंद केल्याने तो उघडण्यास काही वेळ लागला. दरवाजा उघडल्यानंतर कर्मचाऱ्यांना नवजात बाळ कचरापेटीत आढळले.

बाळाची प्रकृती गंभीर असल्याने त्याला तातडीने वांद्रे येथील व्ही. एन. देसाई रुग्णालयात हलविण्यात आले. सध्या नवजात बाळावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. तर संबंधित १९ वर्षीय तरुणीवर जोगेश्वरी ट्रॉमा केअर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## ५८ लाख कुणबी नोंदी कमी करू नका; अन्यथा आंदोलन तीव्र होईल : मनोज जरांगे पाटील

दैनिक आपला विदर्भ

**जालना । प्रतिनिधी :** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर पुन्हा निशाणा साधत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना अंतरवाली येथे समोरासमोर चर्चेचे आव्हान दिले. सरकार सांगत असलेली माहिती खरी की आम्ही मांडत असलेली माहिती खरी, याचा निर्णय मराठा समाजच घेईल,असे ते म्हणाले.

कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेल्या नागरिकांनी २८ तारखेला अंतरवाली येथे उपस्थित राहावे, असे आवाहन करत त्यांनी सरकारच्या विविध दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आंदोलनादरम्यान बलिदान दिलेल्या कुटुंबांना नोकऱ्या, ९०० गुन्हे मागे घेणे तसेच ५८ लाख कुणबी नोंदींवरून प्रमाणपत्रे देण्यात आल्याचे दावे वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचा आरोप त्यांनी केला.



२९ ऑगस्ट २०२५ पासून समितीला एकही नवीन कुणबी नोंद सापडलेली नाही. मग यापूर्वी ५८ लाख नोंदी सापडल्याचा दावा कसा करण्यात आला? आता ही प्रक्रिया का थांबली? असा सवाल उपस्थित करत त्यांनी सरकार मराठा समाजाची दिशाभूल करत असल्याचे म्हटले.

५८ लाख कुणबी नोंदी कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत, 'एकही नोंद कमी करू नका. अन्यथा मराठा समाज रस्त्यावर उतरेल. आंदोलनामुळे रस्ते बंद होण्याची वेळ आली, तर त्याची जबाबदारी सरकारवर असेल, असा इशारा त्यांनी दिला.

अभिजीत दिपके यांच्या कथित धमकीबाबत बोलताना, धमक्यांना आम्ही घाबरत नाही. गरीब मराठा समाजाच्या हितासाठी संयम राखत आहोत; मात्र धमक्या दिल्यास त्यालाही योग्य उत्तर दिले जाईल, असेही जरांगे यांनी स्पष्ट केले.

## 'कर्जमाफी' की OTS? शेतकऱ्यांच्या CIBIL वर टांगती तलवार; सरकारने तातडीने भूमिका स्पष्ट करावी – तुपकर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :**अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेची पहिली लाभार्थी यादी जाहीर झाल्यानंतर राज्यातील शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक लाभार्थ्यांच्या खात्यात थकीत कर्जापेक्षा कमी रक्कम मंजूर झाल्याचे दिसून येत असल्याने ही योजना प्रत्यक्षात कर्जमाफी आहे की 'वन टाइम सेटलमेंट' (OTS), असा प्रश्न उपस्थित केला जात असल्याचे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी म्हटले आहे.

तुपकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सरकारकडून केवळ कर्जाची मुद्दल रक्कम बँकांना अदा केली जाणार असून उर्वरित व्याजाची रक्कम बँकांनी 'राइट-ऑफ' (Write-off) करावी, अशा स्वरूपाच्या सूचनांची चर्चा आहे. मात्र, याबाबत राज्य सरकारने अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण दिलेले नाही.



यामुळे शेतकऱ्यांच्या पतनोंदीवर (CIBIL) विपरीत परिणाम होणार का, याबाबत मोठी चिंता व्यक्त केली जात आहे. कर्ज 'राइट-ऑफ' म्हणून नोंदविले गेल्यास भविष्यात शिक्षण, गृहकर्ज, व्यवसाय किंवा शेतीसाठी कर्ज मिळविताना शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांना अडचणी निर्माण होऊ शकतात, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे.

निवडणुकीपूर्वी सरकारने दोन लाख रुपयांपर्यंत सरसकट कर्जमाफीचे आश्र्वासन दिले होते. त्यामुळे केवळ मुद्दल रक्कम नव्हे, तर व्याजासह संपूर्ण थकीत कर्जाची रक्कम बँकांना अदा करून पात्र शेतकऱ्यांची कर्जखाती पूर्णपणे 'निल' (Nil) करण्यात यावीत, अशी मागणी तुपकर यांनी केली आहे.

तसेच या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या उखइखङ गुणांकनावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही, याची सरकारने स्पष्ट हमी द्यावी. ही योजना OTS नसून खरी कर्जमाफीच असल्याचे अधिकृतपणे जाहीर करून निवडणुकीत दिलेले आश्वासन पूर्ण करावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

## तब्बल ३८ लाखांच्या ई-टॉयलेटमध्ये गेली अनब आतच महिलेसोबात घडलं भयंकर; माथेरानच्या इको पॉईटमधील घटना

**कर्जत । प्रतिनिधी :** पर्यटकांच्या सोयीसाठी लाखो रुपयांचा खर्च करुन तयार केलेल्या सुविधाच याच जीवावर बेतू लागल्या, तर नागरिकांनी प्रशासनावर विश्वास कसा ठेवायचा. सध्या असाच एक धक्कादायक प्रकार माथेरानमधून समोर आलेला आहे. जिथं नगर परिषदेने तब्बल ३८ लाख रुपये खर्च करुन उभारलेल्या ई-टॉयलेटमध्ये एका महिला पर्यटनासोबत घडलेल्या प्रकाराने खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संपूर्ण घटना ही माथेरानमधील प्रसिद्ध असलेल्या इको पॉईट परिसरात घडली आहे. श्वेता निकम नावाच्या महिला पर्यटक आपल्या पतीसोबत तिथं आले होते. मात्र पर्यटन करत असताना या इको पॉईटवरील असलेल्या ई-टॉयलेचा वापर करण्यासाठी आत गेल्या. मात्र काही वेळात बाहेर येत असतानाच अचानक याच ई-टॉयलेच्या दरवाजाचे आतील हँडल तुटले. पर्यटक महिलेने वारंवार प्रयत्न करुनही दरवाजा उघडला नसल्याने त्या प्रचंड घाबरल्या. त्यांनी आतूनच बाहेर उभ्या असलेल्या आपल्या पतीला मदतीसाठी आवाज दिला.

पतीने तातडीने बाहेरुन दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र ई-टॉयलेचा दरवाजा बाहेरूनही उघडत नसल्याने तेथील परिस्थिती अधिकच गंभीर बनली. ई-टॉयलेटमध्ये महिला अडकल्याची माहिती स्थानिक व्यावसायिक रेखा पाटील आणि भरत कारंडे यांना समजली. त्यांनीही तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

## बसस्थानक परिसरात २०० मीटर नो पार्किंग नियमाची कठोर अंमलबजावणी; प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाचा ॲक्शन प्लॅन

दैनिक आपला विदर्भ

*बुलढाणा । प्रतिनिधी :* बसस्थानक परिसरातील वाहतूक कोंडी रोखणे, प्रवाशांच्या सुरक्षिततेची हमी देणे आणि अवैध प्रवासी वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी प्रशासनाने आता कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात नो पार्किंग नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर संयुक्त पथकाद्वारे कठोर कारवाई केली जाणार आहे.

यासंदर्भात बुलढाणा एसटी आगारात पोलीस प्रशासन, प्रादेशिक परिवहन विभाग (), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि खासगी प्रवासी वाहतूकदार यांची संयुक्त जनजागृती व समन्वय बैठक पार पडली. बैठकीत कायद्याचे पालन, वाहतूक शिस्त आणि प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सर्व संबंधितांनी समन्वयाने काम करण्यावर भर देण्यात आला.

बैठकीला शहर पोलीस निरीक्षक संग्राम पाटील, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक प्रताप भोस, उपपोलीस निरीक्षक भूषण पाटील, सहाय्यक वाहन निरीक्षक राधिका चव्हाण, एसटी महामंडळाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी जयंत कांडलकर तसेच आगार व्यवस्थापक अमोल गडलिंग उपस्थित होते.

बैठकीत बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात कोणतेही खासगी अथवा अवैध प्रवासी वाहन उभे करणे तसेच प्रवासी चढ-उतार करणे कायद्याने प्रतिबंधित असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या नियमाचा उद्देश कोणत्याही वाहतूकदारावर निर्बंध आणणे नसून, बसस्थानक परिसरातील वाहतूक सुरळीत ठेवणे, अपघातांचा धोका कमी करणे आणि प्रवाशांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे हा असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

उच्च न्यायालयाचे आदेश, राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी (पोलीस उपमहानिरीक्षक) श्रीमती नारनवरे तसेच पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या निर्देशानुसार, प्रतिबंधित क्षेत्रात बेकायदेशीररीत्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई, वाहन जप्ती तसेच अन्य कायदेशीर उपाययोजना करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला.

प्रशासनाने ही मोहीम कोणाविरुद्ध नसून प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी, कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि बसस्थानक परिसरात शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी असल्याचे स्पष्ट केले. खासगी प्रवासी वाहतूकदार, वाहनचालक आणि त्यांच्या संघटनांनी स्वयंस्फूर्तीने नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही बैठकीत करण्यात आले. प्रवाशांची सुरक्षितता हीच सर्वोच्च जबाबदारी असून, सुरक्षित वाहतूक, शिस्तबद्ध सेवा आणि कायद्याचा आदर हीच जबाबदार वाहतूक व्यवस्थेची खरी ओळख आहे, असा एकमुखी संदेश बैठकीतून देण्यात आला.






## रेल्वेसेवेला चालना

धाराशिव – बीड – छत्रपती संभाजीनगर या रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणास मंजुरी आणि जालना–खामगाव रेल्वेमार्गासाठी ५४ गावांच्या भूसंपादन प्रक्रियेला प्रारंभ करण्याचे झालेले निर्णय मराठवाड्यातील रेल्वे विकासाला चालना देणारेच ठरणार आहेत. रेल्वे रुंदीकरणासाठी या भागातील जनतेला जवळपास तीस वर्षे लढा द्यावा लागला. या लढ्यानंतर मनमाड ते काचीगुडापर्यंत रुंदीकरण झाले खरे; परंतु अजूनही दुहेरीकरण, विद्युतीकरण प्रलंबित आहे. धाराशिव व लातूर या दोन जिल्ह्यांत रेल्वेसेवा पोहोचली नव्हती. आता या दोन्ही जिल्ह्यांतील काही भागांत रेल्वे दिसू लागली आहे. बीड हा रेल्वेच्या नकाशावरील उपेक्षित जिल्हा. अहिल्यानगर ते बीड या रेल्वेमार्गासाठी अनेकवेळा आंदोलने झाली. गोपीनाथ मुंडे आणि माजी खासदार केशरकाकू क्षीरसागर यांनी या मार्गासाठी भरपूर प्रयत्न केले. अखेरीस मोदी सरकार पहिल्यांदा सत्तेवर आल्यानंतर या मार्गाला मंजुरी मिळाली. मुंडे यांच्या आकस्मिक निधनानंतर नगर–बीड रेल्वेचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले होते, ते सरकारने पूर्णत्वासही नेले. गतवर्षी अहिल्यानगरहून सुटलेली रेल्वे बीडपर्यंत जेव्हा धावू लागली, तेव्हा कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंडे यांना आगळी–वेगळी श्रद्धांजली असल्याचे नमूद केले होते. अर्थात, ही रेल्वे परळीपर्यंत जाणे बाकी आहे. या अनुषंगाने विचार करता दोन नव्या मार्गांच्या बाबतीत काही अनुकूल निर्णय झाले असले, तरी त्यास किती दिवस लागतील, हे सांगणे अवघड आहे. जालना ते खामगाव हा मार्ग १६२ किमी.चा असून त्यामुळे विदर्भ आणि मराठवाड्याला रेल्वेसेवेने जोडणे शक्य होणार आहे. वास्तविक या मार्गाचा इतिहास शंभर वर्षांपेक्षा अधिकचा आहे. ब्रिटिश काळात १९१५ मध्ये या मार्गाला हिरवा कंदील दाखविण्यात आला. अजूनही त्याचे भिजत घोंगडे पडले आहे. कारण आता भूसंपादन प्रक्रियेचे आदेश दिले असले, तरी पुढील सुविधांबाबत किती गती मिळेल, हा प्रश्नच आहे. अलीकडच्या काळात रेल्वे मार्गांबद्दल केंद्र आणि राज्य शासनाने अर्धा अर्धा वाटा उचलावा, असे धोरण राहिले आहे. या मार्गांसाठी ४ हजार ९०७ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. याचाच अर्थ त्यातील दोन हजारांवर कोटी राज्यालाउचलावे लागतील. हा खर्चउचलण्याचे राज्य सरकारने मान्य केले आहे. आता भूसंपादन प्रक्रियेचे आदेश दिल्यामुळे रखडलेल्या या प्रकल्पाला गती येईल. त्याची पूर्तता केव्हा होणार, हा मात्र चर्चेचा विषय आहे. कारण याबाबत आतापर्यंत अनेकवेळा आश्वासने दिली गेली. बुलडाणा जिल्हाधिकार्यांनी शेगाव, खामगाव, चिखली, सिंदखेडराजा व देऊळगावराजा या पाच तालुक्यांतील ५४ गावांच्या शिवारात आवश्यक भूसंपादन प्रक्रिया लवकरच सुरू केली जाणार असल्याचे पत्र जारी केले आहे. धाराशिव–बीड–छत्रपती संभाजीनगर मार्गाच्या मंजुरीबाबत लोकसभेत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलेल्या माहितीत या मार्गाचे सर्वेक्षण करण्यास मंजुरी दिली असल्याचे सांगितले आहे. हा मार्ग झाल्यास तीन जिल्हे रेल्वेने जोडले जातील. साहजिकच प्रवाशांचा वेळ वाचून ताण कमी होण्यास मदत होणार आहे. हा मार्ग २४० कि.मी. चा आहे. या प्रक्रियेस किती वर्षे लागतील, हे सांगणे अवघड आहे. कारण हा प्रकल्प प्राथमिक अवस्थेत आहे. पण जेव्हा पूर्ण होईल तेव्हा पर्यटन, उद्योग, शिक्षण आदी विविध क्षेत्रांना लाभ होणार आहे. याशिवाय मालवाहतुकीची सेवा उद्योगांच्या विकासाला पूरक ठरणार आहे. केंद्र सरकारकडे मराठवाड्याचे आणखी काही प्रस्ताव प्रलंबित असून त्यावर निर्णय अपेक्षित आहेत. संभाजीनगर–चाळीसगाव, संभाजीनगर–अहिल्यानगर, जालना–जळगाव, बुलडाणा–लातूर, कलबुर्गी–लातूर हे काही प्रमुख रेल्वे मार्ग. याशिवाय रेल्वेसेवा सक्षम होण्यासाठी दुहेरीकरण, विद्युतीकरणाची कामे हा विषयही प्राधान्याने घ्यावयास हवा. २०२४ मध्ये मराठवाड्यातून डिझेल रेल्वे इंजिन बाद होईल, असे रेल्वेने म्हटले होते. २०२६ उजाडले असले, तरी डिझेलवर सेवा चालू आहे. हे चित्र बदलण्यासाठी लोकप्रतिनिधींचा रेटा आवश्यक ठरतो. मागील केंद्रीय मंत्रिमंडळात जालन्याचे खासदार रावसाहेब दानवे यांच्याकडे रेल्वे राज्यमंत्रिपद होते, तर संभाजीनगरचे डॉ. भागवत कराड यांच्याकडे अर्थखात्याचा पदभार होता. त्यामुळे या क्षेत्राशी संबंधित अनेक कामे मार्गी लागली. रेल्वेस्थानकांचा विकास लक्षात राहील असाच झाला. दुर्दैवाने लोकसभेत दानवे पराभूत झाल्यामुळे या भागातील रेल्वे विकासाला काहीशी खीळ बसली, तरीही या निर्णयामुळे जनतेमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे.

# राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणीसाठी मानकांबाबत विधेयकाच्या अनुषंगाने सूचना पाठविण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणीसाठी मानकांबाबत विधेयका च्या अनुषंगाने सूचना, सुधारणा पाठवू इच्छिणाऱ्या नागरिक व संबंधितांनी आपल्या सूचना, सुधारणा तीन प्रतींमध्ये गुरुवार, २० ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय येथे पाठवाव्यात असे विधान मंडळाचे जितेंद्र भोळे यांनी सांगितले आहे.

महाराष्ट्र विधानसभा २०२६ चे विधेयक क्रमांक ५१ – महाराष्ट्र राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणी करण्यासाठी, अशा आस्थापनांद्वारे ज्या सुविधा व सेवा पुरविण्यात येतील त्यांची किमान मानके विहित करण्याकरिता; आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक असे त्याचे पूर्ण नाव असून सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांच्या संयुक्त समितीकडे हे विधेयक विचारार्थ पाठविण्यात आले आहे.

विधेयकातील तरतुदींच्या अनुषंगाने राज्यातील जनता तसेच संबंधित विषय क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्था, संघटना, छत्र्जी यांचेकडून सूचना, सुधारणा मागविण्याचा निर्णय समितीने २९ जुलै रोजी झालेल्या बैठकीत घेतला आहे.



सूचना, सुधारणा पाठवू इच्छिणाऱ्या नागरिक व संबंधितांनी आपल्या सूचना, सुधारणा तीन प्रतींमध्ये गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा बेताने निम्नस्वाक्षरीत श्री. जितेंद्र भोळे, सचिव–१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई–४०००३२ यांच्याकडे सर्वसाधारण व खंडनिहाय या स्वरुपात पाठवाव्यात. अथवा महाराष्ट्र विधानमंडळाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या https://mahalegislature.org.in/assembly-bill-51/ या लिंकवर देण्यात आलेल्या गुगल फॉर्म (Google Form) द्वारे युनिकोड फॉन्ट (Unicode Font) मध्ये पाठवता येतील.

या विधेयकाच्या मराठी व इंग्रजी प्रती शासकीय ग्रंथागार पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर तसेच व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई–४००००४ यांचेकडे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.तसेच सदरहू विधेयक (मराठी /इंग्रजी) महाराष्ट्र विधानमंडळाच्या उपरोक्त संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे असे सचिव, विधानमंडळ सचिवालय यांनी कळविले आहे.

# अण्णाभाऊ साठे : लेखनाची प्रेरणा

समाजातील उपेक्षित, शोषित आणि वंचित घटकांच्या जीवनाला आपल्या सशक्त लेखणीतून शब्दबद्ध करणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या साहित्याने केवळ मराठी साहित्य समृद्ध केले नाही, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळही अधिक व्यापक केली. त्यांनी आयुष्यभर लेखणीला समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन मानले आणि साहित्याच्या माध्यमातून अन्याय, विषमता, गरिबी, शोषण आणि मानवी वेदना यांना वाचा फोडली. म्हणूनच त्यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण आणि नव्या पिढीमध्ये लेखनाची प्रेरणा जागविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिन 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामागील मूलभूत हेतू म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने, प्रत्येक तरुणाने आणि प्रत्येक संवेदनशील नागरिकाने लेखनाच्या माध्यमातून समाजाशी नाते जोडावे, आपले विचार सुसंस्कृतपणे व्यक्त करावेत आणि मराठी साहित्यविश्र्व अधिक समृद्ध करावे हा आहे. शासन परिपत्रकातही स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक कार्याच्या स्मरणार्थ समाजातील सर्व स्तरांतील प्रतिभावंतांना लेखनाची प्रेरणा मिळावी आणि शैक्षणिक संस्थांमध्ये विविध साहित्यिक उपक्रम आयोजित व्हावेत.

१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे जन्मलेल्या अण्णाभाऊ साठे यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. त्यांना शालेय शिक्षण फारसे घेता आले नाही; परंतु जीवनाच्या कठीण अनुभवांनी त्यांना घडविले. परिस्थितीमुळे त्यांचे कुटुंब मुंबईत स्थलांतरित झाले. गिरणगावातील कष्टकरी जीवन, झोपडपट्ट्यांतील संघर्ष, कामगारांचे हाल, जातीय विषमता आणि सामाजिक अन्याय त्यांनी अत्यंत जवळून अनुभवला. याच अनुभवांनी त्यांच्या साहित्याला वास्तववादी स्वरूप प्राप्त झाले. त्यांनी पुस्तकांमधून जितके शिकले, त्याहून अधिक समाजातून शिकले. त्यामुळे त्यांचे साहित्य कृत्रिम न वाटता जिवंत जीवनाचा आरसा बनले. त्यांनी कधीही राजवाड्यांतील वैभवाची कथा लिहिली नाही; त्यांनी झोपडीतील माणसाचे अश्रू, घाम आणि संघर्ष यांनाच आपल्या साहित्याचा केंद्रबिंदू बनविले.

अण्णाभाऊ साठे हे लोकशाहीर म्हणून जितके लोकप्रिय होते तितकेच ते एक समर्थ कादंबरीकार, कथाकार, लोकनाट्यकार आणि सामाजिक विचारवंत होते. त्यांनी विविध साहित्यप्रकारांत विपुल लेखन केले. त्यांच्या साहित्यामध्ये श्रमिक, दलित, स्थलांतरित, शेतमजूर, स्त्रिया, कष्टकरी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या माणसांचे जीवन अत्यंत प्रभावीपणे चित्रित झाले आहे. त्यांनी साहित्याला केवळ सौंदर्याचा विषय न मानता समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र बनविले. त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत संघर्ष आहे, स्वाभिमान आहे, मानवी प्रतिष्ठेचा आग्रह आहे आणि समतेचा संदेश आहे.

त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीने मराठी साहित्याला नवी दिशा दिली. अन्यायाविरुद्ध झुंज देणाऱ्या सामान्य माणसाच्या संघर्षाचे चित्रण करणारी ही कादंबरी आजही सामाजिक साहित्याचा मानदंड मानली जाते. त्याचप्रमाणे त्यांच्या असंख्य कथा, पोवाडे, लावण्या आणि लोकनाट्यांनी जनतेमध्ये सामाजिक जाणीव निर्माण केली. लोकभाषेतील सहजता, कथनातील ओघवतेपणा आणि वास्तववादी आशय यामुळे त्यांचे साहित्य सर्वसामान्यांच्या मनात घर करून राहिले. त्यांनी लोककलेला परिवर्तनाची दिशा दिली आणि शाहिरीला सामाजिक बांधिलकीचे स्वरूप प्राप्त करून दिले.

अण्णाभाऊ साठे यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही स्वतःच्या वैयक्तिक यशासाठी लेखन केले नाही. त्यांच्या लेखणीचा उद्देश समाजातील अन्याय उघड करणे, वंचितांच्या भावना व्यक्त करणे आणि सामान्य माणसाला आत्मविश्र्वास देणे हा होता. त्यांनी आपल्या साहित्यामधून स्वाभिमान, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा सातत्याने पुरस्कार केला. त्यांच्या मते लेखक हा समाजाचा जागरूक प्रहरी असतो. तो केवळ घटनांचे वर्णन करत नाही, तर समाजाला विचार करायला भाग पाडतो. त्यामुळे त्यांचे साहित्य आजही तितकेच समकालीन आणि प्रेरणादायी वाटते.



आजच्या डिजिटल युगात अभिव्यक्तीची अनेक माध्यमे उपलब्ध झाली आहेत. सामाजिक माध्यमे, संकेतस्थळे, ब्लॉग, ई–पुस्तके आणि विविध डिजिटल व्यासपीठांमुळे प्रत्येकाला आपले विचार मांडण्याची संधी मिळाली आहे. मात्र अभिव्यक्तीची ही संधी जबाबदारीने वापरणे तितकेच महत्त्वाचे आहे. माहितीचा वेग वाढला असला तरी विचारांची खोली कमी होत असल्याची खंत अनेक साहित्यिक व्यक्त करतात. अशा काळात अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आपल्याला शिकवते की लेखन हे केवळ प्रसिद्धी मिळविण्याचे साधन नसून समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाची अभिव्यक्ती आहे. लेखकाने सत्याचा शोध घेतला पाहिजे, मानवी मूल्यांचा सन्मान केला पाहिजे आणि समाजातील सकारात्मक परिवर्तनासाठी लेखणीचा उपयोग केला पाहिजे.

याच व्यापक विचारातून महाराष्ट्र शासनाने 'लेखन प्रेरणा दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. शासन परिपत्रकानुसार विद्यापीठे, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, स्थानिक साहित्यिकांच्या मुलाखती व व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व साहित्यावर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलनांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी, लेखनाची आवड आणि साहित्यिक संवेदनशीलता विकसित करणे हा आहे.

लेखन ही केवळ शब्दांची मांडणी नसते; ती विचारांची शिस्त, संवेदनशीलतेची अभिव्यक्ती आणि समाजाशी असलेल्या नात्याची जाणीव असते. जेव्हा एखादा विद्यार्थी कविता लिहितो, कथा रचतो, निबंध मांडतो किंवा एखाद्या सामाजिक विषयावर आपले मत व्यक्त करतो, तेव्हा तो केवळ लेखन करत नसतो; तो आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही करत असतो. लेखनामुळे निरीक्षणशक्ती वाढते, चिकित्सक दृष्टी विकसित होते, भाषेवर प्रभुत्व मिळते आणि समाजातील विविध प्रश्नांकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता निर्माण होते. म्हणूनच 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून विचारक्षम, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा एक प्रभावी सामाजिक उपक्रम आहे.

आजच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल माध्यमे आणि सामाजिक माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे अभिव्यक्तीची साधने बदलली असली तरी प्रभावी लेखनाचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. उलट माहितीच्या प्रचंड प्रवाहात सत्य, विवेक, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी जपणारे लेखन अधिक आवश्यक बनले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या काळात लेखणीला परिवर्तनाचे शस्त्र बनविले; आजच्या पिढीने तीच लेखणी ज्ञान, विज्ञान, लोकशाही, संविधानिक मूल्ये आणि मानवी संवेदनशीलता यांची वाहक बनविण्याची गरज आहे. लेखन प्रेरणा दिनाचा खरा अर्थ केवळ लेखनस्पर्धा आयोजित करणे एवढाच नसून विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याची वृत्ती, चिकित्सक विचारसरणी, कल्पकता आणि सामाजिक बांधिलकी विकसित करणे हा आहे.

लेखन ही एक सर्जनशील प्रक्रिया आहे. ती माणसाला स्वतःशी संवाद साधायला शिकवते. वाचनातून विचार जन्माला येतात आणि विचारांमधून लेखन घडते. त्यामुळे लेखन प्रेरणा दिन हा प्रत्यक्षात वाचन संस्कृतीलाही बळ देणारा उपक्रम आहे. ज्या समाजात वाचनाची सवय दृढ असते, त्या समाजात विचारांची देवाणघेवाण समृद्ध होते, मतभिन्नतेचा आदर वाढतो आणि लोकशाही अधिक मजबूत होते. अण्णाभाऊ साठे यांनी स्वतः औपचारिक शिक्षणाची मर्यादा असतानाही सातत्याने वाचन, निरीक्षण आणि अनुभव यांच्या बळावर स्वतःला घडविले. त्यामुळे त्यांचे जीवन प्रत्येक विद्यार्थ्याला एक महत्त्वाचा संदेश देते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द, जिज्ञासा आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या जोरावर मोठे साहित्य निर्माण करता येते.

आज शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी विविध उपक्रमांची आवश्यकता आहे. शासनाच्या परिपत्रकातही कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, स्थानिक साहित्यिकांची व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व साहित्यावर चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलनांचे आयोजन करण्यावर भर देण्यात आला आहे. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देतात, भाषिक कौशल्य वाढवितात आणि साहित्याबद्दल आत्मीयता निर्माण करतात.



लेखनाची खरी प्रेरणा पुरस्कारातून नव्हे, तर समाजाशी असलेल्या नात्यातून निर्माण होते. जेव्हा लेखक समाजातील वेदना अनुभवतो, सामान्य माणसाच्या आशा–आकांक्षा समजून घेतो आणि त्या प्रामाणिकपणे शब्दबद्ध करतो, तेव्हा त्याचे साहित्य काळाच्या कसोटीवर टिकते. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य याच कारणामुळे आजही अभ्यासले जाते. त्यांनी कधीही कल्पनारम्य वैभवाचे चित्र रंगविले नाही; त्यांनी वास्तवाला शब्द दिले. त्यांच्या लेखनातील पात्रे ही संघर्ष करणारी, स्वाभिमान जपणारी आणि परिवर्तनाची स्वप्ने पाहणारी माणसे आहेत. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ एका समाजघटकाचे प्रतिनिधित्व करत नाही, तर संपूर्ण मानवतेच्या संघर्षाची गाथा बनते.

मराठी भाषा ही संत, समाजसुधारक, विचारवंत आणि साहित्यिक यांच्या समृद्ध परंपरेने घडलेली भाषा आहे. संत ज्ञानेश्र्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, विंदा करंदीकर आणि अण्णाभाऊ साठे यांसारख्या अनेक थोर व्यक्तींनी आपल्या लेखणीतून समाजमन घडविले. या परंपरेचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आजच्या तरुण पिढीवर आहे. लेखन प्रेरणा दिन हा त्या जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने, संशोधकाने, शिक्षकाने आणि साहित्यप्रेमीने आपल्या अनुभवांना, निरीक्षणांना आणि विचारांना शब्दरूप देण्याचा संकल्प या दिवशी करणे आवश्यक आहे.

लेखन ही समाजपरिवर्तनाची शांत पण अत्यंत प्रभावी प्रक्रिया आहे. तलवारीने जिंकलेली मने काळानुसार बदलतात; परंतु विचारांनी जिंकलेली मने कायमस्वरूपी परिवर्तन घडवितात. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून हेच सिद्ध करून दाखविले. त्यांच्या लेखणीत संघर्ष होता, पण द्वेष नव्हता; विद्रोह होता, पण विध्वंस नव्हता; अन्यायाविरुद्ध प्रखर आवाज होता, पण मानवतेवरील विश्र्वास कधीही डळमळला नाही. म्हणूनच त्यांचे साहित्य आजही सामाजिक समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रभावी प्रतीक मानले जाते.

आजच्या काळात लेखन केवळ साहित्यनिर्मितीपुरते मर्यादित राहिलेले नाही. संशोधन, पत्रकारिता, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, न्यायव्यवस्था, शिक्षण, उद्योग, सामाजिक कार्य आणि डिजिटल माध्यमे अशा प्रत्येक क्षेत्रात प्रभावी लेखनाचे महत्त्व वाढत आहे. विचार स्पष्टपणे आणि जबाबदारीने मांडण्याची क्षमता ही यशस्वी व्यक्तिमत्त्वाची ओळख बनली आहे. त्यामुळे लेखन प्रेरणा दिन हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या व्यापक ध्येयाशी जोडलेला उपक्रम आहे.

अण्णाभाऊ साठे यांचे जीवन हे आशावाद, संघर्ष आणि सर्जनशीलतेचा प्रेरणादायी प्रवास आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी जागतिक कीर्तीचे साहित्यिक म्हणून स्वतःचे स्थान निर्माण केले. त्यांनी सिद्ध केले की लेखक घडण्यासाठी संपन्न साधने नव्हे, तर जिद्द, संवेदनशीलता आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी आवश्यक असते. त्यांचे संपूर्ण जीवन नवोदित लेखकांसाठी एक प्रेरणादायी विद्यापीठ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा जपत समाजहिताचे, मानवतावादी मूल्यांचे आणि सत्यनिष्ठेचे लेखन करणे.

१ ऑगस्ट रोजी साजरा होणारा 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ एका महान साहित्यिकाच्या जयंतीचे औचित्य नसून विचार, वाचन, लेखन आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा उत्सव आहे. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत, प्रत्येक ग्रंथालयात आणि प्रत्येक घरात या दिवसाच्या निमित्ताने वाचनाची, चिंतनाची आणि लेखनाची नवी चळवळ सुरू झाली, तर तीच अण्णाभाऊ साठे यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या लेखणीने पेटविलेली सामाजिक जागृतीची मशाल आजच्या पिढीने ज्ञान, समता, न्याय आणि मानवतेच्या प्रकाशाने अधिक तेजस्वी करावी, हाच 'लेखन प्रेरणा दिनाचा' खरा संदेश आहे.

------------------

**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत) ईमेल –** bagate.rajendra5gmail.com

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# अमळनेर: पुरात अडकलेल्या एक महिन्याच्या बाळासह कुटुंबाची थरारक सुटका

## आरोग्य व अग्निशमन पथकाचे धाडसी बचावकार्य





दैनिक आपला विदर्भ

**जळगाव । प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील अमळनेर शहरात मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरात गुरुकृपा कॉलनीतील एका घरात अवघ्या एक महिन्याच्या बाळासह संपूर्ण कुटुंब अडकून पडले होते. घरात वेगाने पाणी शिरल्याने कुटुंबीय जीव वाचवण्यासाठी धडपड करत होते. मात्र, अमळनेर नगरपालिकेच्या आरोग्य विभाग आणि अग्निशमन दलाच्या धाडसी बचावकार्यामुळे सर्वांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. भालेराव नगर येथील गुरुकृपा कॉलनीत नाल्याला पूर आल्याने छातीएवढे पाणी साचले होते. घरामध्ये एक महिन्याचे बाळ, त्याची आई, तीन महिला, तीन लहान मुले आणि इतर कुटुंबीय अडकले होते. घरात पाणी शिरल्याने सर्वजण उंच जागेवर उभे राहून मदतीची वाट पाहत होते.

घटनेची माहिती मिळताच मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या निर्देशानुसार आरोग्य निरीक्षक किरण कंडारे, गोल्डी बिऱ्हाडे तसेच अग्निशमन दलाचे फारुख शेख, दिनेश बिऱ्हाडे, भिका सदानंदशीव आणि पवन बिऱ्हाडे यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पाण्याचा प्रवाह प्रचंड असल्याने दोर, लाइफ जॅकेट आणि मानवी साखळीच्या मदतीने तब्बल दोन तासांच्या प्रयत्नांनंतर पथकाने कुटुंबापर्यंत पोहोचण्यात यश मिळवले.

बचावकार्यादरम्यान एक महिन्याच्या बाळाला प्लास्टिकच्या टबमध्ये सुरक्षित ठेवून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर बाळासह सर्व कुटुंबीयांना जवळील इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. या धाडसी बचावकार्याबद्दल आरोग्य विभाग आणि अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अतिवृष्टीग्रस्त देवगाव-मुंदाणेला जिल्हाधिकाऱ्यांची भेट; पंचनामे व मदतकार्याला गती देण्याचे आदेश

दैनिक आपला विदर्भ





**जळगाव । प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे देवगाव आणि मुंदाणे परिसरात मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी शुक्रवारी अतिवृष्टीग्रस्त गावांना भेट देऊन परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. नुकसानग्रस्त नागरिकांशी संवाद साधत त्यांनी प्रशासनाला पंचनामे तातडीने पूर्ण करून मदतकार्याला गती देण्याचे निर्देश दिले.

देवगाव येथे अतिवृष्टी व पुरामुळे शेतीसह जनावरांचे मोठे नुकसान झाले आहे. काही शेतकऱ्यांची जनावरे दगावली असून, काही जनावरे पुराच्या पाण्यात वाहून गेल्याची प्राथमिक माहिती प्रशासनाला मिळाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि आवश्यक ती मदत त्वरित उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

यानंतर जिल्हाधिकारी घुगे यांनी मुंदाणे (प्र. उ.) या गावालाही भेट देत तेथील नुकसानीचा आढावा घेतला. यावेळी पारोळा मतदारसंघाचे आमदार अमोल पाटील, तहसीलदार तसेच महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते. प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता पंचनामे पूर्ण करावेत, तसेच नुकसानग्रस्तांना शासनाची मदत लवकरात लवकर मिळेल यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासन युद्धपातळीवर कार्यरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## महत्त्वाचे...

### चारचाकी वाहन मासिक भाडेतत्त्वावर देण्यासाठी सिलबंद निविदा मागविल्या; ५ ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा कार्यालयाच्या दैनंदिन कार्यालयीन कामकाज व दौऱ्यांसाठी चालक व इंधनासह चारचाकी वाहन मासिक भाडेतत्त्वावर उपलब्ध करून घेण्यासाठी इच्छुक सेवा पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत. संबंधित निविदा ५ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयात सादर कराव्यात, असे आवाहन सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या शासन ज्ञापनानुसार जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रास वाहन भाडेतत्त्वावर घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार कार्यालयातील गठित समितीने दरमहा ३ हजार किलोमीटरपर्यंत वापरासाठी चारचाकी वाहन भाड्याने घेण्याचा निर्णय घेतला आहे.

इच्छुक सेवा पुरवठादारांनी विहित नमुन्यातील दरपत्रकासह , पॅनकार्ड, वाहन चालकाचा परवाना, विमा, आरसी बुक, टुर्स अँड ट्रॅव्हल्स नोंदणी प्रमाणपत्र व जीएसटी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. वाहन हे पहिल्या मालकीचे व पाच वर्षांपेक्षा कमी कालावधीतील असावे. अलीकडे खरेदी केलेल्या वाहनांना प्राधान्य दिले जाणार आहे.निवड झालेल्या सेवा पुरवठादाराने कार्यादेश मिळाल्यानंतर दोन दिवसांच्या आत चालकासह सुस्थितीतील वाहन उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. वाहनाची देखभाल, इंधन, वंगण, दुरुस्ती तसेच चालकाचे मानधन याची जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील. दौऱ्यादरम्यान लागणारा टोल कर मात्र मासिक भाड्यासोबत अदा करण्यात येणार आहे.

कार्यालयाकडून चालकाला ओव्हरटाईमचा कोणताही मोबदला देण्यात येणार नाही. वाहन २४ तास, सातही दिवस (२४७) उपलब्ध ठेवणे आवश्यक असून, प्रत्येक सेवा पुरवठादारास केवळ एकच दरपत्रक सादर करता येईल. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या निविदांचा विचार केला जाणार नसल्याचेही सहायक आयुक्त. ग. प्र. बिटोडे यांनी स्पष्ट केले आहे.

### १७ वर्षीय महिला क्रिकेटपटूची आत्महत्या; क्रिकेट संघात निवड न झाल्याची खंत

**नागपुर । प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील नागपूरमधून एक अत्यंत दु:खद घटना समोर आली आहे. नागपूरमधील १७ वर्षीय महिला क्रिकेटपटूने आत्महत्या केली आहे. या महिला क्रिकेटपटूची ओळख अदिती चौखंडे अशी पटली आहे. घटनास्थळी एक सुसाईड नोटही सापडली आहे. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतला आणि तो शवविच्छेदनासाठी पाठवला. अदिती चौखंडे हिने क्रिकेट संघात निवड न झाल्याने आत्महत्या करण्याचं टोकाचं पाऊल उचललं असल्याचा उल्लेख सुसाईड नोटमध्ये केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अदिती चौखंडे ही मूळची महाराष्ट्रातील अकोला येथील होती. गेल्या दोन वर्षांपासून ती नागपूरमधील लक्ष्मी नगर येथील 'उमालक्ष्मी अपार्टमेंट्स'मध्ये आपल्या आईसोबत व भावासोबत राहत होती.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन ३ ऑगस्ट रोजी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी, गाऱ्हाणी आणि प्रशासकीय अडचणींचे वेळेत निराकरण करण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सोमवार दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे 'जिल्हास्तरीय लोकशाही दिन' आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्या मांडण्यासाठी या व्यासपीठाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**अर्जासाठी निकष :** लोकशाही दिनात तक्रार सादर करताना नागरिकांनी विहित अर्ज केवळ शासनाने ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यातच असावा, तक्रार किंवा निवेदन केवळ वैयक्तिक स्वरूपाचे असावे. (सामूहिक स्वरूपाचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत), अर्जाच्या दोन प्रती, संबंधित लोकशाही दिनाच्या किमान १५ दिवस आधी सादर करणे आवश्यक राहिल. तालुका लोकशाही दिनानंतर एक महिन्याने जिल्हास्तरावर, तर जिल्हास्तरांनंतर २ महिन्यांनी विभागीय आणि त्यानंतर २ महिन्यांनी मंत्रालयीन स्तरावर अर्ज करता येईल.

**'हे' अर्ज स्विकारले जाणार नाहीत :** न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व अपिल्स, सेवा व आस्थापना विषयक बाबी, विहीत नमून्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे/देण्यात येणार आहे अशा प्रकरणांत पून्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/निवेदन वैयक्तीक स्वरुपाची नसेल तर, वरील प्रमाणे जे अर्ज लोकशाही दिनाकरीता स्विकृत करता येऊ शकत नाहीत असे अर्ज सामान्य तक्रार या स्वरुपात संबंधित विभागांकडे आवश्यक कारवाईसाठी ८ दिवसांत पाठवून त्याची प्रत अर्जदारास दिली जाईल.

**व्हॉट्सअॅ ॲप चॅटबॉट सुविधा :** नागरिकांच्या सोयीसाठी प्रशासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. आता नागरिक आपल्या तक्रारी आणि अर्ज ९४२३१८४८०४ या व्हॉट्सॲप क्रमांकावर चॅटबॉटद्वारे देखील सादर करू शकतात. जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्यासाठी या लोकशाही दिनाचा सकारात्मक लाभ घ्यावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी कळविले आहे.

## नीट निकालाबाबत याचिका खंडपीठाने फेटाळल्या, ५ हजारांचा दंड

**छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी :** मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठानं नव्यानं घेण्यात आलेल्या नीट परीक्षेच्या निकालात तफावत असल्याची तक्रार करणारी याचिका फेटाळून लावली आहे. ४ विद्यार्थ्यांनी निकालात तफावत असल्याची तक्रार करून याचिका दाखल केली होती. त्यावर मूळ उत्तर पत्रिका आणि गुणपत्रिकेतील गुण सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यावर एनटीएने मूळ उत्तर पत्रिका सादर करत आपली बाजू मांडली. त्यानंतर न्यायालयाने गुरुवारी ३० जुलैला या याचिका फेटाळल्या. तसेच याचिका करणाऱ्या ४ विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी ५ हजार रुपये वसूल करण्यात यावेत, असे निर्देश न्यायालयाने दिल्याची माहिती ॲडव्होकेट महेंद्र गंडले यांनी दिली. गंडले यांनी विद्यार्थ्यांकडून न्यायालयात बाजू मांडली.

**निकालाविरोधात न्यायालयात धाव :** नीट पेपरफुटीमुळे देशभर घमासान झालं. अनेक विद्यार्थ्यांनी आयुष्य संपवलं. त्यामुळे युवकांनी रोष व्यक्त करत आंदोलन केलं. आंदोलक विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदावरुन पायउतार व्हावं लागलं. दरम्यानच्या काळात पेपर फुटल्याने नव्याने परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आली. परीक्षा झाल्यानंतर निकालाबाबत अनेक विद्यार्थ्यांनी शंका व्यक्त केली.

## राजकारणाचा कंटाळा आला; पण तुमच्या मनात राहायचं आहे : मुंडे

दैनिक आपला विदर्भ



**सिरसाळा (ता. परळी, जि. बीड) :** वयाच्या २४ व्या वर्षी राजकारणात आले. चार दशकांहून अधिक काळाच्या प्रवासानंतर आता राजकारणाचा अक्षरशः कंटाळा आला आहे. मात्र मला सत्तेत नाही, तर तुमच्या मनात राहायचं आहे, अशा भावनिक शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी बंजारा समाजाला साद घातली. त्यांच्या या वक्तव्याची सिरसाळा येथील कार्यक्रमात जोरदार चर्चा रंगली.

लोकनेते तथा माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त परळी तालुक्यातील सिरसाळा येथे आयोजित कार्यक्रमात पंकजा मुंडे आणि माजी मंत्री धनंजय मुंडे एकाच व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी पंकजा मुंडे यांनी सामाजिक, राजकीय आणि विकासाच्या विविध मुद्द्यांवर भाष्य केले.

शिवात शक्ती नसेल तर शिव हा शव आहे. स्त्री-पुरुष खांद्याला खांदा लावून चालले तरच शिवशक्ती निर्माण होते, असे सांगत त्यांनी समाजातील महिला-पुरुष समान सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. बंजारा समाजात आजही अपेक्षित बदल झालेला नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या चारपदरी रस्त्यांसह विविध विकासकामांचा उल्लेख करत विकासाच्या प्रक्रियेला गती देण्याची गरज त्यांनी मांडली. तसेच शेतकरी आणि कष्टकरी समाजाचा उल्लेख करत, तुमच्या हातातील कोयता जाऊ नये; मात्र त्या कोयत्याला योग्य भाव आणि कष्टाला योग्य फळ मिळाले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्रीपदाच्या संदर्भात बोलताना वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाचा गौरव करत त्यांनी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या सामाजिक कार्याचाही उल्लेख केला. भाषणाच्या शेवटी मला सत्तेत नाही, तर तुमच्या मनात राहायचं आहे, असे भावनिक आवाहन करत त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

## भेसळयुक्त पनीर-तुपावर अन्न सुरक्षा विभागाचा धडक छापा; साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त, डेअरी सील







दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या सुरक्षित अन्न, सुरक्षित महाराष्ट्र मोहिमेअंतर्गत अन्न सुरक्षा विभागाने छत्रपती संभाजीनगरातील एमआयडीसी चिकलठाणा परिसरात भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थांवर मोठी कारवाई केली. अमोल दूध डेअरी येथे टाकलेल्या छाप्यात भेसळयुक्त पनीर, गाईचे तूप, क्रीम आणि नॉन-फूड ग्रेड सोयाबीन तेल असा सुमारे ३ लाख १२ हजार ३८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यानंतर संबंधित डेअरीचा परवाना तात्काळ निलंबित करून उत्पादन युनिट बंद करण्यात आले.

अन्न सुरक्षा विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. तपासादरम्यान नॉन-फूड ग्रेड सोयाबीन तेलाचा वापर करून अनालॉग पनीर व गाईचे तूप तयार केले जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. छाप्यात २९९ किलो तूप, १९९ किलो क्रीम, १७४ किलो पनीर आणि २७८ किलो रिफाइंड सोयाबीन तेल असा एकूण ९५० किलो वजनाचा साठा जप्त करण्यात आला.

तपासात या डेअरीतून शहरातील लक्ष्मी डेअरीच्या टीव्ही सेंटर, कामगार चौक आणि श्रीराम चौक (दरगा रोड) येथील तीन विक्री केंद्रांना पनीर व गाईचे तूप पुरवठा केला जात असल्याचे उघड झाले. त्यानंतर अन्न सुरक्षा विभागाने या तिन्ही विक्री केंद्रांवरही कारवाई करत ४१ किलो गाईचे तूप जप्त केले. संबंधित अन्न नमुने पुढील तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

या धडक कारवाईनंतर संबंधित उत्पादन युनिटचा परवाना तात्काळ निलंबित करण्यात आला असून आस्थापना बंद करण्यात आली आहे. ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा रोडे, कीर्तिका झाडे, प्रज्ञा सुरसे, फरीद सिद्दीकी व योगेश चिभाडे यांनी सहायक आयुक्त दयानंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली तसेच संयुक्त आयुक्त श्रीकांत करकळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.

# बुलढाण्यात पावसाचा धुवाधार कहर

दैनिक आपला विदर्भ

## जळगाव जामोदमध्ये २४ तासांत तब्बल २०७ मिमी पाऊस

**बुलढाणा । प्रतिनिधी :** तब्बल दोन आठवड्यांच्या विश्रांतीनंतर बुलढाणा जिल्ह्यात पावसाने दमदार पुनरागमन करत जनजीवन आणि शेतीला मोठा दिलासा दिला आहे. गेल्या २४ तासांत जिल्ह्यात सर्वदूर मुसळधार पाऊस कोसळला असून, जळगाव जामोद तालुक्यात सर्वाधिक २०७.४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. नांदुरा तालुक्यात १७४.८ मिलिमीटर पाऊस पडत विक्रमी पर्जन्यमानाची नोंद झाली आहे.

जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यांमध्ये शंभर मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस झाला. खामगाव १५२.९ मिमी, शेगाव १३९ मिमी, मलकापूर १३१.२ मिमी, संग्रामपूर ११७.८ मिमी, मेहकर १११ मिमी, चिखली १०९ मिमी, मोताळा १०६.७ मिमी, बुलढाणा १०४ मिमी, लोणार १०० मिमी, सिंदखेड राजा ९८.१ मिमी आणि देऊळगाव राजा ८२.५ मिमी पावसाची नोंद झाली.


वार्षिक सरासरीत जळगाव जामोद अव्वल

यंदाच्या पावसाळ्यातील एकूण पर्जन्यमानाच्या तुलनेत जळगाव जामोद ७१.९३ टक्के पावसासह जिल्ह्यात आघाडीवर आहे. त्यापाठोपाठ शेगाव, नांदुरा, मोताळा, बुलढाणा आणि मेहकर तालुक्यांनीही समाधानकारक पर्जन्यमान गाठले आहे.

खरीप पिकांना दिलासा; अतिवृष्टीने नुकसानही

दोन आठवड्यांच्या उघडीपीनंतर झालेल्या या पावसामुळे सोयाबीन, कापूस, तूरसह खरीप पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे. मात्र, जळगाव जामोद आणि नांदुरा तालुक्यात अल्पावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतांमध्ये पाणी साचून सोयाबीन, कापूस आणि तूर पिकांचे प्राथमिक स्तरावर नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

नद्या-नाले दुथडी भरून वाहू लागले





सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील नद्या, नाले आणि लघू सिंचन प्रकल्प तुडुंब भरू लागले आहेत. मध्यम व मोठ्या धरणांमध्ये अद्याप ४० ते ६० टक्के पाणीसाठा असून, आगामी काही दिवस पावसाचा जोर कायम राहिल्यास जलसाठ्यात आणखी लक्षणीय वाढ होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

## वृत्तविशेष...

### पेनटाकळी धरण ५६.५१ टक्के भरले; नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** पेनटाकळी प्रकल्पात सातत्याने पाण्याची आवक सुरू असून शुक्रवार (३१ जुलै) रोजी धरणातील जलसाठा ५६.५१ टक्क्यांवर पोहोचला आहे. त्यामुळे पुढील काळात पाण्याची आवक वाढल्यास धरणातून विसर्ग करावा लागू शकतो. या पार्श्वभूमीवर जलसंपदा विभागाने नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

उपविभागीय अभियंता, पेनटाकळी प्रकल्प व्यवस्थापन उपविभाग, मेहकर यांनी प्रसिद्ध केलेल्या सूचनेनुसार, प्रकल्पाच्या मंजूर जलाशय व द्वार संचालन सूचीनुसार जुलै अखेर धरणात ६९ टक्के जलस्तर कायम ठेवण्याचे नियोजन आहे. मात्र, पाणलोट क्षेत्रात पाऊस वाढल्यास तसेच उर्ध्व बाजूच्या प्रकल्पांतून पाण्याचा विसर्ग झाल्यास पेनटाकळी धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नदीपात्रात विसर्ग सोडावा लागू शकतो.

जलसंपदा विभागाने नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी सतर्क राहावे, तसेच जनावरे, वाहने, शेती अवजारे, चल मालमत्ता व इतर साहित्य सुरक्षित ठिकाणी हलवावे, असे आवाहन केले आहे. तसेच दवंडी किंवा मुनादीद्वारे नागरिकांना सूचना देऊन प्रशासनाने आवश्यक खबरदारी घ्यावी, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

### अनोळखी मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी पोलिसांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** बुलढाणा ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत आढळून आलेल्या एका अनोळखी वृद्ध व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोस्टे बुलढाणा ग्रामीण येथे मर्ग क्र. ३४/२०२६ कलम १९४ बीएनएसएस () अन्वये नोंद करण्यात आली आहे. सुमारे ७० वर्षे वयाचा, अंदाजे ५.५ फूट उंचीचा अनोळखी इसम दिव्य सेवा प्रकल्प, वरवंडचे संचालक अशोक काकडे यांनी उपचारासाठी सामान्य रुणालय, बुलढाणा येथे दाखल केला होता. उपचारादरम्यान संबंधित व्यक्तीचा २२ जुलै २०२६ रोजी मृत्यू झाला.

मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नसून, त्याचा फोटो व वर्णनाच्या आधारे शोध सुरू आहे. सदर व्यक्ती आपल्या परिसरातून हरवलेली असल्याची माहिती कोणाकडे असल्यास किंवा संबंधित व्यक्तीची ओळख पटत असल्यास तात्काळ पोलीस स्टेशन बुलढाणा ग्रामीण येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. अधिक माहितीसाठी पोलीस स्टेशन बुलढाणा ग्रामीण ०७२६२-२४१२५५, पोलीस निरीक्षक आशिष रोही ९६०७३०८२२४, तपास अधिकारी पोहेकॉ कैलास उगले (ब. नं. ७१४) : ८८८८११७१४ तसेच, नागरिकांनी ही माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवून मृत व्यक्तीची ओळख पटविण्यास सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

### नाफेडकडून कांदा दरात पुन्हा वाढ

**नाशिक । प्रतिनिधी :** कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देत नाफेडमार्फत आणि एनसीसीएफ मार्फत करण्यात येणाऱ्या कांदा खरेदीच्या किमान हमी खरेदी दरात पुन्हा एकदा वाढ केली असून ही या हंगामातील सातवी वाढ आहे. ३० जुलै २०२६ पासून ग्रेड-ए दर्जाच्या कांद्यासाठी प्रतिक्विंटल २,३३५ रुपये इतका नवीन हमी दर लागू करण्यात आला आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. याबाबत केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या कॉस्टिंग सेलने अधिकृत आदेश जारी केला आहे. त्यानुसार, ३० जुलैपासून ग्रेड-यूआरएस कांद्याची खरेदी बंद करण्यात येणार असून, केवळ ग्रेड-ए दर्जाचा कांदाच खरेदी केला जाणार आहे.

## टीबीमुक्त बुलढाणासाठी सीईओ गुलाब खरात यांचा पुढाकार; सहा महिन्यांसाठी टीबी रुग्ण दत्तक

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानाला गती देत जिल्ह्यातून क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी कौतुकास्पद पुढाकार घेत एका टीबी रुग्णाला पुढील सहा महिन्यांसाठी दत्तक घेतले आहे. निक्षय मित्र म्हणून त्यांनी रुग्णाच्या पोषण आहाराची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या निक्षय मित्र उपक्रमांतर्गत टीबी रुग्णांना औषधोपचारासोबत सकस व पौष्टिक आहार उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. याच अनुषंगाने श्री. खरात यांनी रुग्णाला पोषण आहाराचे किट सुपूर्द करून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही. एम. मोहन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) शिवकर भारसाकळे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा तसेच आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दिनकर खेडकर उपस्थित होते.




**पोषण आहार किटमध्ये काय? :** दत्तक कालावधीत दरमहा रुग्णाला देण्यात येणाऱ्या न्यूट्रिशन किटमध्ये गहू, ज्वारी, बाजरी, डाळ, खाद्यतेल तसेच दूध किंवा दूध पावडर यांचा समावेश करण्यात आला आहे. टीबी रुग्णांच्या उपचारांमध्ये पौष्टिक आहार महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी सांगितले की, टीबी हा केवळ आरोग्याचा विषय नसून सामाजिक जबाबदारीचाही भाग आहे. समाजातील दानशूर व्यक्ती, लोकप्रतिनिधी, अधिकारी, स्वयंसेवी संस्था आणि उद्योजकांनी मोठ्या संख्येने निक्षय मित्र म्हणून पुढे यावे. प्रत्येक टीबी रुग्णाला पोषण आहार व मानसिक आधार मिळाल्यास बुलढाणा जिल्हा लवकरच टीबीमुक्त होईल.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या या संवेदनशील आणि प्रेरणादायी पुढाकारामुळे जिल्ह्यातील इतर अधिकारी, संस्था व नागरिकांनाही निक्षय मित्र म्हणून पुढे येण्याची प्रेरणा मिळत असून, टीबीमुक्त बुलढाणाच्या अभियानाला नवी बळकटी मिळाली आहे.

## जिल्ह्यात दमदार पाऊस; प्रशासन हायअलर्टवर, नागरिकांनी सतर्क राहावे - पालकमंत्री मकरंद जाधव पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पुरस्थिती निर्माण झाली असून प्रशासन पूर्णपणे सतर्क आहे. जिल्हाधिकारी आणि प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सातत्याने संपर्कात असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत आहे. पावसामुळे बाधित झालेल्या सर्व नागरिकांना शासनामार्फत आवश्यक ती मदत दिली जाईल. नागरिकांनी घाबरून न जाता आवश्यक खबरदारी घ्यावी आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी केले आहे.



जिल्ह्यातील सततच्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. जिल्ह्यातील एकूण ९२ महसूल मंडळांपैकी तब्बल ९१ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली असून, अनेक भागांमध्ये अद्यापही हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे.

सततच्या पावसामुळे उभी पिके, घरे तसेच विविध पायाभूत सुविधांचे नुकसान झाले असून प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण व पंचनामे सुरू केले आहेत. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर चोवीस तास लक्ष ठेवून असून पूरपरिस्थितीचा सातत्याने आढावा घेतला जात आहे. संबंधित विभागांना बाधित शेती, घरे आणि इतर मालमत्तेच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

नागरिकांनी नदी, नाले आणि धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे, तसेच प्रशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहनही पालकमंत्री मकरंद पाटील यांनी केले आहे.

## वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष महागात; डोणगावात २० दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव बसस्थानक परिसरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध डोणगाव पोलिसांनी विशेष तपासणी मोहीम राबवत २० दुचाकीस्वारांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली. या कारवाईमुळे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली.

पोलीस उपनिरीक्षक विजय अजमिरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेत विनाहेल्मेट वाहन चालविणे, ट्रिपल सीट प्रवास करणे, वाहनाची आवश्यक कागदपत्रे जवळ न बाळगणे तसेच इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांची कसून तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २० दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक विजय अजमिरे यांनी वाहनचालकांना वाहतूक नियमांचे महत्त्व पटवून देत हेल्मेटचा नियमित वापर, वाहनाची कागदपत्रे सोबत ठेवणे, वेगमर्यादेचे पालन करणे आणि ट्रिपल सीट प्रवास टाळण्याचे आवाहन केले. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही अशाच प्रकारच्या विशेष मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले असून, नागरिकांनी स्वतःच्या आणि इतरांच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन डोणगाव पोलिसांकडून करण्यात आले.

## रक्षाबंधनानिमित्त मलकापूर रेल्वे डाक सेवा विभागाची नवी सुविधा

### १ ऑगस्टपासून मलकापूर सॉर्टिंग काउंटरवर रात्री ९ वाजेपर्यंत पार्सल व स्पीड पोस्ट बुकिंग

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना मोठा दिलासा देत मलकापूर रेल्वे डाक सेवा विभागाने १ ऑगस्ट २०२६ पासून ''मलकापूर सॉर्टिंग काउंटर'' येथे सायंकाळी ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत विशेष बुकिंग सुविधा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही माहिती रेल्वे डाक सेवा, नागपूरचे अधीक्षक गणेश बी. अंभोरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

या विशेष सुविधेमुळे नियमित कार्यालयीन वेळेत पोस्ट ऑफिसमध्ये येऊ न शकणारे नोकरदार, व्यापारी, विद्यार्थी तसेच इतर नागरिकांना संध्याकाळच्या वेळेतही स्पीड पोस्ट, पार्सल आणि आंतरराष्ट्रीय टपालाची बुकिंग करता येणार आहे. मलकापूर सॉर्टिंग काउंटरवर स्पीड पोस्ट बुकिंग, पार्सल बुकिंग, आंतरराष्ट्रीय टपाल बुकिंग (पत्र, पार्सल व ) सेवा उपलब्ध राहणार आहेत

रक्षाबंधन सणाच्या काळात बहिणींना राखी आणि भेटवस्तू वेळेत पाठविण्यासाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार असून, देशभरासह परदेशातील प्राप्तकर्त्यांपर्यंत टपाल वेळेत पोहोचविण्यास मदत होणार आहे. अधीक्षक गणेश बी. अंभोरे यांनी नागरिकांना या विशेष सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले असून, मलकापूर रेल्वे डाक सेवा विभागाने सर्व ग्राहकांना रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छाही दिल्या आहेत.

## बुलडाणा जिल्ह्यात अतिवृष्टीसदृश पाऊस; परिस्थितीचा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतला आढावा

- » जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा
- » तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यकांना गावात उपस्थित राहण्याच्या सूचना,
- » नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीसदृश पावसामुळे अनेक तालुक्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले असून शेतीपिके, घरे आणि पायाभूत सुविधांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः संग्रामपूर आणि जळगाव जामोद तालुक्यांना मुसळधार पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण देवरे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून जिल्ह्यातील पावसाच्या परिस्थितीची सविस्तर माहिती घेतली.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्र्यांनी प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देत गावपातळीवर तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांनी मुख्यालयी उपस्थित राहून परिस्थितीवर लक्ष ठेवावे, अशी सूचना दिली. तसेच नदीकाठच्या गावांतील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतीचे तातडीने पंचनामे करावेत आणि पडझड झालेल्या घरांचेही त्वरित पंचनामे करून मदत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

३० आणि ३१ जुलैदरम्यान जिल्ह्यात सर्वत्र संततधार पाऊस झाला. जळगाव जामोद तालुक्यात सर्वाधिक २०७.४ मिमी पावसाची नोंद झाली. त्याखालोखाल नांदुरा १७४.८ मिमी, खामगाव १५२.१ मिमी, शेगाव १३९.७ मिमी, मलकापूर १३७.२ मिमी, संग्रामपूर ११७.८ मिमी, मेहकर १११ मिमी, चिखली १०९.८ मिमी, मोताळा १०६.७ मिमी, बुलढाणा १०४.८ मिमी, लोणार १०० मिमी, सिंदखेडराजा ९८.१ मिमी आणि देऊळगाव राजा ८२.५ मिमी पावसाची नोंद झाली.

दोन तालुके वगळता तब्बल ११ तालुक्यांमध्ये १०० मिमीपेक्षा अधिक पाऊस झाल्याने नदी-नाले दुथडी भरून वाहत आहेत. अनेक ठिकाणी शेतजमिनींमध्ये पाणी साचले असून पिकांचे नुकसान, माती वाहून जाणे आणि घरांची पडझड होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

जिल्हा प्रशासनाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले असून महसूल, कृषी आणि ग्रामविकास यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच नागरिकांनी अनावश्यकपणे नदी-नाल्यांमध्ये किंवा पूरग्रस्त भागात जाणे टाळावे



आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.